संतोष (अप्पा) दसवडकर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेली कामे,

① अपुरे कर्मचारी असल्यामुळे रुग्णांचे होणारे हाल. तसेच तज्ञ डॉक्टरांची पदे रिक्त असल्यामुळे संतोष (अप्पा) दसवडकर यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णालयाला टाळे ठोकण्याचा इशारा.

### वेल्हे ग्रामीण रुग्णालय

# अपुरे कर्मचारी; सुविधांचा अभाव

## रुग्णांचे हाल : मागणी पूर्ण न केल्यास टाळे ठोकण्याचा मनसेचा इशारा

**वेल्हे, ता. २२ :** वेल्हे येथील ग्रामीण रुग्णालयात अत्यावश्यक सुविधा व अपुरा कर्मचारीवर्ग लवकर उपलब्ध न झाल्यास रुग्णालयास टाळे ठोकू, असा इशारा मनसे जिल्हा कामगार सेनेचे उपाध्यक्ष संतोष दसवडकर यांनी दिला.

आरोग्य केंद्रास भेट देऊन मनसेच्या कार्यकर्त्यांनी नुकतीच पाहणी केली. त्या वेळी तेथे अनेक गैरसोयी दिसून आल्या. रुग्णालयात केवळ दहा खाटा (बेड) होत्या, तर उर्वरित साहित्य अडगळीत पडून असल्याचे दिसून आले. विशेष म्हणजे वीस रुग्ण फरशीवर गाद्या टाकून उपचार घेत होते.

तालुक्याच्या ठिकाणी हे तीस खाटांचे (बेडचे) ग्रामीण रुग्णालय आहे. मावळ भाग व वेल्हे परिसरातून गरीब व गरजू रुग्ण येथे येतात. मात्र, येथे अत्यावश्यक सेवा मिळत नाही. वैद्यकीय अधिकारी, तज्ज्ञ डॉक्टर व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. रुग्णालयात चोवीस तास वीज नाही. पाण्याची कमतरता आहे. तसेच इतर आरोग्य साहित्याचाही अभाव आहे. या स्थितीबाबत मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष ॲड. रवींद्र गारुडकर, कामगार सेनेचे उपाध्यक्ष संतोष दसवडकर, तालुकाध्यक्ष दिगंबर चोरगे, सचिन वालगुडे, दत्ता शेंडकर, विलास रेणुसे, दत्ता रेणुसे, धनंजय लिम्हण, संपत पवार आदींनी वैद्यकीय अधिकाऱ्यांची भेट घेतली. त्या वेळी त्यांनी काही डॉक्टर व इतर कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत, असे सांगितले.

रुग्णालयात अत्यावश्यक सुविधा व अपुरा कर्मचारीवर्ग त्वरित उपलब्ध करावा, अशी मागणी केली आहे. दुर्गम भागातील रुग्णांना सुविधा न मिळाल्यास 'मनसे' कार्यकर्ते रुग्णालयास टाळे ठोकून तीव्र आंदोलन करतील, असा इशारा देण्यात आला आहे. या बाबत ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. बोरा म्हणाले, की सोमवार-शुक्रवारी बाजाराचा दिवस असल्याने दवाखान्यात गर्दी असते. कर्मचारीवर्ग वाढविण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच अन्य सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही मागणी करण्यात आली आहे.